# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.02.2025** **वार- बुधवार**

---

<u>शिबस्था</u>

पुण्यातील शिवाजीनगर बसस्थानक पुनर्बांधणीचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातील एका बैठकीत आढावा घेतला. शिवाजीनगर इथं आधुनिक सोयींनी युक्त बसस्थानक उभारावं आणि राज्य मार्ग परिवहन महामंडळासोबत महामेट्रोनं समन्वयानं काम करावं, असे निर्देशही त्यांनी दिले.

<u>जीबीएस</u>

पुण्यात गुईलेन बॅरे सिंड्रोमचे पाच नवे रुग्ण सापडले असून, बाधित रुग्णसंख्या १९७ वर पोहोचली आहे. दिवसभरात काल १३ रुग्ण बरे होऊन घरी परतले. आतापर्यंत १०४ रुग्णांना घरी पाठविण्यात आलं आहे. २२ रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर असून, ५० रुग्णांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. १९७ संशयित जीबीएस रुग्णांपैकी १७२ रुग्णांना जीबीएस झाल्याचं निदान झालं आहे. सात रुग्णांचा आजवर मृत्यू झाला आहे. सर्वाधिक ९२ रुग्णसंख्या महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट गावांमधील आहे.

<u>पाणी</u>

गुलियन बॅरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं आतापर्यंत शहरातील पिण्याचं दूषित पाणी पुरविणाऱ्या २४ अनधिकृत खासगी आरओ प्लांट्सवर कारवाई केली आहे. तसंच २७ वॉटर एटीएम देखील बंद करण्यात आले आहेत, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. शहरातील सहा विहिरींसह विविध ठिकाणचे ५ हजार ९०५ पाण्याचे नमुने तपासण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

<u>साखर</u>

साखर आयुक्त डॉक्टर कुणार खेमनार यांची मुंबईत महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या रिक्त असलेल्या सहमुख्य कार्यकारी अधिकारपदी नियुक्ती करण्यात आली आहे.  साखर आयुक्तालयाचा कार्यभार अतिरिक्त पदभार अन्य अधिका-यांकडे सोपविला जाणार आहे.

कॉपी

मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसाच्या कृती आराखड्याच्या अंतर्गत इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात कॉपीमुक्त अभियान राबवलं जात आहे. यासाठी पालिकेच्या शिक्षण विभागानं पाच भरारी पथकांची नेमणूक केली आहे. मनपा हद्दीतील परीक्षा केंद्रांवर प्रत्यक्ष भेटी देऊन काही गैरप्रकार होऊ नये याची दक्षता ही पथकं घेणार आहेत.

रावेत

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत रावेत प्रकल्पातील ९३४ सदनिकांकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं ऑनलाईन पद्धतीनं सोडत काढली होती. परंतु महानगरपालिकेकडून रावेत इथला प्रकल्प रद्द करण्यात आला होता. रावेत प्रकल्पातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतर्गत प्राप्त होणाऱ्या

किवळे इथल्या सदनिका देण्याचं आता नियोजन आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी त्यासाठी स्वतःचं संमतीपत्र १५ मार्चपर्यंत सादर करण्याचं आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केलं आहे.

## कारवाई

अतिवेगानं गाडी चालविणा-या चौदा हजारांपेक्षा अधिक वाहनचालकांवर प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग पथकानं कारवाई केल्याची माहिती पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी दिली आहे.  महामार्गावर वाहन चालविताना अपघात होऊ नये, यासाठी प्रत्येक गाडी निर्धारित वेगानं आणि नियमानुसार चालविणं आवश्यक आहे. वळण आणि घाट मार्गात गाडीचा वेग कमी ठेवणं गरजेचं असतं. परंतु अशा ठिकाणी काही वाहनचालक अतिवेगानं गाडी चालवितात, त्यांच्यावर वायुवेग पथकाकडून कारवाई केली जात आहे.

## म्युच्युअल

भांडवली म्युच्युअल फंडांमध्ये गेल्या महिन्यात 39 हजार कोटी रुपयांहून अधिक निव्वळ गुंतवणूक झाली. भारतीय म्युच्युअल फंड्स संघटनेनं आज प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार, लहान भांडवली फंडांमध्ये 22 टक्क्यांची वाढ होऊन 5 हजार 720 कोटी रुपये गुंतविण्यात आले. तर मध्यम भांडवली फंडांमध्ये एक टक्क्याहून अधिक वाढ होऊन 5 हजार 147 कोटी रुपये गुंतविण्यात आले.

## शेअर-बाजार

मुंबई शेअर बाजाराचा सूचकांक सेन्सेक्स आज 122 अंकांनी घसरुन 76 हजार 171 अंकांवर बंद झाला. त्याचप्रमाणं राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी हा सूचकांक 26 अंकांनी घसरुन 23 हजार 45 अंकांवर स्थिरावला.

## कर्करोग

ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड विद्यापीठातील संशोधकांनी लहान मुलांमधील घातक कर्करोगावर एक नवीन उपचार पद्धत शोधून काढली आहे. रोग प्रतिकार पेशी तयार करुन त्यांचा वापर करण्याची ही पद्धत असल्याचं आज प्रकाशित केलेल्या या संशोधनात म्हटलं आहे. लहान मुलांमधील सरकोमा हा कर्करोग अस्थी आणि स्नायू, चरबी आणि रक्तवाहिन्यांमधील मऊ उतींमध्ये विकसित होतो. या कर्करोगाच्या गाठी अतिशय वेगानं वाढून सर्व शरीरात पसरतात, त्यामुळं त्यावर उपचार करणं अवघड होतं. नव्या संशोधनामुळे हा उपचार सोपा होण्याची अपेक्षा आहे.

## क्रिकेट

भारत आणि इंग्लंड दरम्यान पन्नास षटकांच्या विद्यमान मालिकेत अहमदाबाद इथं सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अंतिम क्रिकेट सामन्यात भारतानं आज प्रथम फलंदाजी करताना सर्व बाद 356 धावा केल्या आहेत. पाहुण्यांनी नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. या मालिकेतील पहिले दोन सामने जिंकून भारतानं विजयी आघाडी घेतली आहे.

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 34 अंश तर किमान 15 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.